सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

बुधवार, दि. १ जुलै २०२६

https://epaper.citynewssuperfast.com

## अतिक्रमण नियमित करण्यासाठी मुद्रांक पत्राची सक्ती नको

प्रतिनिधी १ जुलै

**कळंब** : नगरपंचायत हद्दीतील नझूल जागेवरील निवासी अतिक्रमण नियमितीकरण प्रकरणात शासन निर्णयानुसार केवळ स्वघोषणापत्र स्वीकारावे, मुद्रांक पत्रावरील शपथपत्राची सक्ती करू नये, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. २५ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयात अर्जदाराकडून स्वघोषणापत्र घेण्याची स्पष्ट तरतूद आहे. मात्र, काही प्रकरणांत १०० रुपयांच्या दोन मुद्रांक पत्रांवर शपथपत्र सादर करण्याची सक्ती केली जात असल्याची तक्रार संबंधितांनी केली आहे. याबाबत ओमप्रकाश मारोतराव भवरे यांनी नगरपंचायतीकडे निवेदन सादर करून शासन निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे. मुद्रांक पत्रांची सक्ती केल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांवर अनावश्यक आर्थिक भार पडत असून, शासनाने दिलेल्या सवलतीचा उद्देशच बाधित होत असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने तत्काळ योग्य निर्देश देऊन ही सक्ती थांबवावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

# मुदतबाह्य कीटकनाशकांचा साठा जप्त

### १७.८२ लाखांचा मुद्देमाल सीलबंद : कृषी विभागाच्या भरारी पथकाची खैरगाव येथे कारवाई

प्रतिनिधी १ जुलै

**यवतमाळ** : पांढरकवडा तालुक्यातील खैरगाव (दे.) येथे कृषी विभागाच्या भरारी पथकाने केलेल्या कारवाईत मुदतबाह्य कीटकनाशके, अनधिकृत रासायनिक खते व जैवउत्तेजकांचा मोठा साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणी १७ लाख ८२ हजार १३५ रुपयांचा २,२८५ किलो मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, संबंधित तरुणाविरुद्ध पांढरकवडा पोलीस ठाण्यात विविध कायद्यांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



कृषी विभागाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे खैरगाव (दे.), ता. केळापूर येथील रहिवासी यश गजानन शिवनवार (वय २६) यांच्या राहत्या घरावर मंगळवारी छापा टाकण्यात आला. तपासणीदरम्यान कोणताही वैध परवाना नसताना विक्रीच्या उद्देशाने मोठ्या प्रमाणात मुदतबाह्य कीटकनाशके, रासायनिक खते आणि जैवउत्तेजकांचा साठा करून ठेवल्याचे आढळून आले.

पंचांसमक्ष करण्यात आलेल्या कारवाईत ३५८.५५ किलो मुदतबाह्य कीटकनाशके, १,७३५ किलो अनधिकृत रासायनिक खते आणि १८८.१५ किलो जैवउत्तेजक असा एकूण २,२८५ किलो साठा जप्त करण्यात आला. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत १७ लाख ८२ हजार १३५ रुपये असल्याची माहिती कृषी विभागाने दिली.

याप्रकरणी यश शिवनवार यांच्याविरुद्ध कीटकनाशक अधिनियम १९६८, अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ तसेच खत नियंत्रण आदेश १९८५ अंतर्गत विविध कलमांनुसार पांढरकवडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्हास्तरीय भरारी पथकाचे अध्यक्ष तथा मोहीम अधिकारी प्रवीण जाधव, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक धीरज मोहेकर, कृषी अधिकारी सुरेश चव्हाण, रुपाली इंगळे, राहुल डाखोरे, निलेश भोयर, सुरेश बुटले आणि राहुल डंभारे यांनी ही कारवाई केली.

संचालक सुनील बोरकर, विभागीय कृषी सहसंचालक गणेश घोरपडे, मुख्य गुणवत्ता नियंत्रण अधिकारी प्रवीण देशमुख, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे आणि कृषी विकास अधिकारी लहूदास आडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली.

## काँग्रेसच्या पुसद तालुका अध्यक्षपदी ज्ञानदीप कांबळे यांची नियुक्ती

प्रतिनिधी १ जुलै

**पुसद** : अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खा. मल्लिकार्जुन खरगे आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते खा. राहुल गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या संघटन सृजन अभियानांतर्गत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने पुसद तालुका काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी ज्ञानदीप कांबळे यांची नियुक्ती केली आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार ही नियुक्ती जाहीर करण्यात आली.

संघटन सृजन अभियानाच्या अनुषंगाने प्रदेश काँग्रेसच्या निरीक्षकांनी विधानसभा मतदारसंघनिहाय दौरे करून स्थानिक नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी चर्चा केली होती. त्यानुसार करण्यात आलेल्या शिफारशींचा विचार करून ज्ञानदीप कांबळे यांच्या नावावर अंतिम शिक्कामोर्तब करण्यात आले.



माळ पठार परिसरातील प्रभावी युवा नेतृत्व म्हणून ओळख असलेल्या ज्ञानदीप कांबळे यांनी यापूर्वी भीमशक्तीचे जिल्हाध्यक्ष म्हणून गोरगरीब व वंचितांच्या न्यायहक्कांसाठी काम केले आहे. त्यानंतर काँग्रेस पक्षात प्रवेश करून त्यांनी पुसद तालुका काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष म्हणून जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली. माजी सामाजिक न्याय मंत्री तथा खासदार चंद्रकांत हांडोरे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या दोन दशकांपासून त्यांनी विविध सामाजिक प्रश्नांवर आंदोलने, मोर्चे आणि उपोषणे करून सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. निवडीनंतर प्रतिक्रिया देताना ज्ञानदीप कांबळे यांनी ग्रामीण भागात काँग्रेस संघटना अधिक मजबूत करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. माळ पठारावरील चाळीस गावांचा पाणीप्रश्न, पुसद जिल्हा निर्मितीचा मुद्दा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या सौंदर्यीकरणाचे काम, रखडलेली घरकुल योजना, पांदण रस्ते तसेच ग्रामीण भागातील विविध विकासकामांसाठी शासन दरबारी सातत्याने लढा उभारून न्याय मिळवून देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

ज्ञानदीप कांबळे यांच्या निवडीमुळे माळ पठार परिसरासह पुसद तालुक्यात काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून विविध राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिकांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. आपल्या निवडीचे श्रेय त्यांनी काँग्रेस नेते तथा नगर परिषद विरोधी पक्षनेते डॉ. मोहम्मद नदीम, जिल्हाध्यक्ष ॲड. सचिन नाईक, माजी आमदार डॉ. वजाहत मिर्झा तसेच पत्रकार बांधवांना दिले.

## पुसदमध्ये पावसाची दमदार हजेरी

### साचलेल्या पाण्यात चिमुकल्यांचा जल्लोष

प्रतिनिधी १ जुलै

**पुसद** : पुसद शहरात मंगळवारी झालेल्या दमदार पावसामुळे अनेक सखल भागांमध्ये पाणी साचले. गेल्या काही दिवसांपासून जाणवत असलेल्या उकाड्यानंतर झालेल्या या पावसामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला.



पावसाच्या जोरदार सरींमुळे शहरातील काही मोकळ्या जागा आणि मैदानांमध्ये पाणी साचले. या पाण्यात परिसरातील चिमुकल्यांनी मनमुराद आनंद लुटला. पावसाची पर्वा न करता पाण्यात धावपळ, खेळ आणि जल्लोष करत त्यांनी पावसाच्या आगमनाचा आनंद साजरा केला.

पावसात भिजत खेळणाऱ्या मुलांचे हे निरागस दृश्य पाहण्यासाठी नागरिकांनीही गर्दी केली. या क्षणांनी अनेकांच्या बालपणीच्या आठवणींना उजाळा मिळाला. दरवर्षीप्रमाणे यंदाही मान्सूनच्या आगमनाने चिमुकल्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

दरम्यान, साचलेल्या पाण्यात खेळताना मुलांच्या सुरक्षिततेची काळजी घेणे आवश्यक असल्याने पालकांनी सतर्क राहून आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पावसाचा आनंद लुटतानाच सुरक्षिततेलाही प्राधान्य देण्याची गरज व्यक्त करण्यात येत आहे.

## 'स्कूल चले हम' ; जिल्ह्यात शाळा प्रवेशोत्सव

### जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे स्वागत : गणवेश व पाठ्यपुस्तकांचे वितरण

प्रतिनिधी १ जुलै

**यवतमाळ** : उन्हाळी सुट्टीनंतर मंगळवारपासून जिल्ह्यातील शाळा पुन्हा गजबजल्या. नव्या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी आयोजित करण्यात आलेला 'शाळा प्रवेशोत्सव' जिल्हाभर उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हाधिकारी, वरिष्ठ अधिकारी, मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांना शिक्षणाच्या प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.

जिल्हाधिकारी विकास मीना यांनी गोधणी रोड येथील जिल्हा परिषद





माध्यमिक विद्यालयाला भेट देऊन विद्यार्थ्यांचे पुष्प देऊन स्वागत केले. तसेच त्यांच्या हस्ते नवागत विद्यार्थ्यांना गणवेश आणि पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी शासनाच्या विविध शैक्षणिक योजना, उपलब्ध सुविधा आणि जिल्हा प्रशासनाच्या उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच सामाजिक आणि पर्यावरणीय जबाबदाऱ्यांचे भान ठेवावे, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी शाळेतील विविध सुविधांची पाहणी करून आवश्यक त्या सुधारणा आणि उपाययोजनांबाबत सूचना केल्या. तसेच शाळा परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. यावेळी शिक्षणाधिकारी किशोर पागोरे, मुख्याध्यापक साहेबराव पवार, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

चिचबर्डीतही उत्साहात प्रवेशोत्सव

जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी शाळांना भेटी देऊन प्रवेशोत्सवात सहभाग घेतला. यवतमाळ तालुक्यातील चिचबर्डी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत जिल्हा माहिती अधिकारी पवन राठोड यांच्या उपस्थितीत शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांना गणवेश आणि पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. मुख्याध्यापिका संगीता चनेकर, लिपिक विजय राठोड, शिक्षकवृंद आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेतकरी पुत्राची गळफास घेऊन आत्महत्या

प्रतिनिधी १ जुलै

**मारेगाव** : मारेगाव पोलीस स्टेशन हद्दीत येत असलेल्या वेगाव येथील २० वर्षीय शेतकरी पुत्राने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना मंगळवार दि. ३० जून २०२६ ला सकाळी ६ वाजताच्या सुमारास उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

विश्वास उर्फ सिद्धांत व्यासनाथ मत्ते वय २०, रा. वेगाव, ता. मारेगाव असे मृतकाचे नाव आहे. त्यांच्या कुटुंबाकडे सुमारे चार एकर शेती असून ते शेतकरी कुटुंबातील होते. त्यांच्या पश्चात आई, वडील व एक बहीण असा परिवार आहे. त्यांच्या अकाली निधनाने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

त्याच्या आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून



घटनेची माहिती मिळताच मारेगाव पोलीस घटनास्थळी दाखल झाले घटनास्थळ पंचनामा करून त्याचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालय मारेगाव येथे पाठवण्यात आला आहे.

सदर प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक सागर दानडे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक किसन सुनकुरवार पोलीस कॉन्स्टेबल संभा लनगुडे करीत आहेत.

## जे.एस.पी.एम. उर्दू हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत

### फुलसावंगीत नवीन शैक्षणिक वर्षाची जल्लोषात सुरुवात



प्रतिनिधी १ जुलै

**फुलसावंगी** : नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी फुलसावंगी येथील जे.एस.पी.एम. उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज (कला शाखा) येथे नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. शाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ, गुलाबपुष्प आणि टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापक मोहम्मद मुसद्दीक यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा देत नियमित उपस्थिती, शिस्त, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सर्वांगीण विकासाचे महत्त्व विशद केले.

कार्यक्रमादरम्यान शिक्षकांनी नवागत विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांची ओळख करून घेतली. तसेच शाळेतील विविध उपक्रम, नियम आणि शैक्षणिक वातावरणाची माहिती देऊन विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि उत्साहामुळे शाळेचा परिसर चैतन्यमय झाला होता. यावेळी शिक्षक सय्यद वसीम रिझवी, सय्यद मुजाहिद, शाहिद खान, शबिना बानो, सुमय्या अंजुम, फातेमा शेख तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी इरफान देशमुख, शेख जावेद, रफीक गौरी, रफीक नवाब आणि शेख मुजफ्फर उपस्थित होते.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये शाळेबद्दल आपुलकी निर्माण होण्यासह शिक्षणाविषयी सकारात्मक दृष्टीकोन विकसित झाला असून नवीन शैक्षणिक वर्षाची उत्साहपूर्ण सुरुवात झाली आहे.

## नेग वसुलीच्या वादातून किन्नरांचे दोन गट भिडले; दोन्ही गटांमध्ये लेखी समझोता

प्रतिनिधी १ जुलै

**वणी** : नेग वसुलीच्या अधिकारावरून वणी शहरात मंगळवारी किन्नरांच्या दोन गटांमध्ये वाद उफाळून आला. शाब्दिक बाचाबाचीचे रूपांतर धक्काबुक्की व मारहाणीत झाल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांच्या मध्यस्थीनंतर दोन्ही पक्षांमध्ये लेखी समझोता झाल्याने प्रकरण निवळले.

मिळालेल्या माहितीनुसार, चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा येथील किन्नरांचा एक गट गेल्या अनेक वर्षांपासून वणी शहरात विवाह, बाळाचा जन्म, गृहप्रवेश आदी मांगलिक कार्यक्रमांमध्ये नेग वसुलीचे काम करीत आहे. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून अमरावती व यवतमाळ येथील दुसरा किन्नर गटही शहरात नेग वसुली करू लागल्याने उत्पन्नाच्या वाटणीवरून वाद निर्माण झाला होता.

यापूर्वीही या प्रश्नावर तोडगा काढण्याचे प्रयत्न झाले होते. मात्र, कोणताही निर्णय न झाल्याने मंगळवारी दोन्ही गट पुन्हा आमनेसामने आले. वाद चिघळून धक्काबुक्की व मारहाणीपर्यंत पोहोचल्याने परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला.

घटनेनंतर दोन्ही गट वणी पोलीस ठाण्यात दाखल झाले. तेथेही एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप सुरूच होते. पोलीस निरीक्षक भानुदास पिदूरकर यांनी दोन्ही गटांच्या प्रतिनिधींशी सुमारे दोन तास चर्चा करून समुपदेशन केले. अखेरीस, दोन्ही पक्षांनी शहरात शांतता राखण्याचे व एकमेकांच्या नेग वसुलीच्या कामात हस्तक्षेप न करण्याचे लेखी आश्वासन दिले.

घटनेची माहिती शहरभर पसरताच वणी पोलीस ठाण्याबाहेर नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. घडामोडी जाणून घेण्यासाठी अनेकांनी पोलीस ठाण्याकडे धाव घेतली.

दरम्यान, कोणताही किन्नर अथवा इतर व्यक्ती जबरदस्तीने नेग किंवा पैशांची मागणी करत असल्यास, दबाव टाकत असल्यास किंवा त्रास देत असल्यास नागरिकांनी तातडीने पोलीस ठाण्यात तक्रार करावी. अशा प्रकरणांत कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलीस निरीक्षक भानुदास पिदूरकर यांनी दिला.

# हिवरा बसस्थानकावर वाहतूक कोंडी

प्रतिनिधी १ जुलै

**महागाव** : महागाव तालुक्यातील हिवरा संगम येथील बसस्थानक परिसरात वाढत्या अतिक्रमणामुळे आणि अरुंद रस्त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत असून प्रवासी व नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. वारंवार होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे अनेकदा अपघातही घडले असून संबंधित यंत्रणांनी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वरील हिवरा संगमजवळ बायपास रस्त्याचे काम शासन स्तरावर प्रस्तावित करण्यात आले आहे. मात्र, विविध कारणांमुळे हे काम अद्याप रखडलेले असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे. बायपासचे काम पूर्ण झाल्यास गावातील वाहतुकीवरील ताण कमी होईल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

हिवरा बसस्थानकावर अधिकृत थांबा असतानाही अनेक एसटी बसेस येथे न थांबता पुढे जात असल्याचा आरोप प्रवाशांनी केला आहे. याबाबत सामाजिक कार्यकर्त्यांनी एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदनेही दिली आहेत. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने प्रवाशांमध्ये संतापाची भावना आहे.

हिवरा संगम हे तालुक्यातील प्रमुख बाजारपेठेचे केंद्र असून परिसरातील अनेक गावांतील शेतकरी आपला शेतमाल विक्रीसाठी येथे आणतात. तसेच शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी, बँकेची कामे करणारे नागरिक आणि व्यापाऱ्यांचीही या ठिकाणी मोठी वर्दळ असते. त्यामुळे वाहतुकीची समस्या अधिक तीव्र होत आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकडून या समस्येकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त केली जात आहे. हिवरा संगम येथील वाहतूक कोंडी, अतिक्रमण आणि एसटी बसेस न थांबण्याची समस्या तातडीने सोडवावी, अशी मागणी स्थानिक नागरिक आणि प्रवासी वर्गाकडून करण्यात येत आहे.

## पाच हजार बालकांना पल्स पोलिओचा डोस; ३० बूथवर ९० आरोग्य कर्मचाऱ्यांची सेवा

### नगराध्यक्षा तेजश्री जैन यांच्या हस्ते शुभारंभ

प्रतिनिधी १ जुलै

**उमरखेड** : राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेंतर्गत उमरखेड शहरात रविवारी पाच हजारांहून अधिक बालकांना पोलिओ प्रतिबंधक डोस देण्यात आला. शहरातील ३० बूथवर ९० आरोग्य कर्मचाऱ्यांनी ही मोहीम यशस्वीपणे राबविली.

राजाराम प्रभाजी उत्तरवार शासकीय उपजिल्हा रुग्णालयाच्या वतीने मोहिमेसाठी आवश्यक ती सर्व तयारी करण्यात आली होती. शून्य ते पाच वर्षे वयोगटातील जवळपास सहा हजार बालकांना लसीकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. त्यापैकी पाच हजारांहून अधिक बालकांना पोलिओचा डोस देण्यात आला.

स्थानिक महात्मा गांधी चौक येथील बूथवर नगराध्यक्षा तेजश्री संतोष जैन यांच्या हस्ते एका बालकाला पोलिओ लस पाजून मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी रोटरी क्लबचे डॉ. यादव राऊत, डॉ. विशाल माने, उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ. संभाजी डोंगे, डॉ. अक्यामवार, सह आरोग्य निरीक्षक आर. हिंगमिरे, लसीकरण विभाग प्रमुख शीतल बोंडगे, आरोग्य सेवक ए. विणकर यांच्यासह आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

देशात १९९५ पासून सातत्याने पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येत असून १३ जानेवारी २०११ नंतर देशात एकही पोलिओग्रस्त रुग्ण आढळून आलेला नाही. या मोहिमेच्या यशामुळे भारताने पोलिओमुक्त देशाचा दर्जा कायम राखला आहे. ही स्थिती कायम ठेवण्यासाठी प्रत्येक बालकापर्यंत पोलिओचा डोस पोहोचविणे आवश्यक असल्याचे आरोग्य विभागाने सांगितले.

चौकट : पाच दिवस घराघरांत जाऊन लसीकरण

बूथवर लसीकरणापासून वंचित राहिलेल्या शून्य ते पाच वर्षे वयोगटातील बालकांना पुढील पाच दिवस घराघरांत जाऊन पोलिओचा डोस देण्यात येणार आहे. कोणतेही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी आरोग्य विभागाने विशेष नियोजन केले असल्याची माहिती उपजिल्हा रुग्णालय प्रशासनाने दिली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय द्वारा ॲड राजेश शहा बिल्डींग (लाला बिल्डींग समोर ) अवधूतवाडी यवतमाळ ता. जि. यवतमाळ येथे प्रकाशित केले. ■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135